# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०४/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## मौदा येथील सोयाबीन क्रुड ऑईल चोरी करणारे आरोपी अटकेत

दिनांक २४/०४/२०२४ रोजी पोस्टे मौदा हद्दीतील महालगाव जवळ ट्रॅक्टर क्र. एन एल ०१/ए सी ६९१२ चा चालक व छोटे मालवाहू टाटा वाहन क्र. एम एच ४७ ई ०७०२ चालक अशा दोन्ही आरोपींनी मिळून एबीस एक्सोर्ट्स इंडीया प्रायवेट लिमिटेड, राजनंदगाव (छत्तीसगड) चे मालकीचे अंदाजे एकूण १०० किलो सोयाबीन क्रुड ऑईल चोरी केले असे फिर्यादी निरज युवराज गायकवाड, रा फ्रेन्ड्स कॉलनी काटोल रोड नागपूर याचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे अप क्र. ४६२/२४ कलम ३७९, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासात **आरोपी १) ट्रॅक्टर चालक नामे ब्रिजेशकुमार लालचंद उपाध्याय, रा. कौसलपट्टी जि. प्रतापगड (उत्तरप्रदेश) २) टाटा एस वाहनाचा चालक आसिफ अब्दुलवफा सिद्दीकी रा. कळमना नागपूर** हे संगणमत करून क्रुड ऑईल चोरी करत असे. पोस्टे मौदा येथील टँकरचे पाठलाग करून त्याच्यावर पाहणी ठेवून नमूद आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींकडुन गुन्ह्यासंबंधी ५७,०२,३५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश बोथले हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपूत, पो.उपनि महेश बोथले, पो.हवा. संदीप कडु, गणेश मुदमाळी, रुपेश महादुले, पो.ना. दिपक दरोडे, पो.अ शुभम ईश्वरकर अतिश गाढवे यांनी केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर